# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ , अमरावती

## मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम 0721

राष्ट्रीय सेवा योजना पथक
विभाजन विभिषिका स्मृतीदिन साजरा
संक्षिप्त अहवाल
**Date-14/08/2022**

# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय वाशिम जिल्हा वाशिम
# राष्ट्रीय सेवा योजना पथक
## विभाजन विभिषिका स्मृतीदिन साजरा
## संक्षिप्त अहवाल
## Date-14/08/2022

---

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दिनांक 14 ऑगस्ट 2022 ला विभाजन विभिषिका स्मृतिदिना निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य संजय गोटे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बी आर तनपुरे होते कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. तसेच भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांना याप्रसंगी श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. व्ही बी चांदजकर यांनी केले. त्यात त्यांनी फाळणीच्या वेळी अनेकांना विस्थापित व्हावे लागले. अनेकांना आपला संसार सोडावा लागला. लोकांना बलिदान द्यावे लागले. त्यांच्या स्मृतींना कुठेतरी उजाळा मिळावा, तुझ्या आठवणी नेहमी आपल्या मनात राहाव्यात या व्यापक दृष्टिकोनातून अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या मार्गदर्शना डॉ. बी आर तनपुरे यांनी भारत पाकिस्तान फाळणी हे एक कटू सत्य असल्याचे सांगत फाळणीमुळे या दोन्ही देशांची प्रगती पाहिजे तेवढ्या प्रमाणात झाले नसल्याचे सांगितले. फाळणीच्या इतिहासाचा काळाकुट्ट असून तो इतिहास सन्मानाचा नसून भारतासाठी फार हानिकारक असल्याचे सांगितले. फाळणीमुळे युवावर्ग, वयोवृद्ध, लहान बालके, महिला यांना आपले प्राण द्यावे लागले. त्यांचे आज कुठेही नाव नसले तरी त्यांच्या आठवणी ह्या नेहमी मनात राहणे आवश्यक असून त्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन युवकांनी वाटचाल करण्याचे सांगितले. एकसंघ देश हा केव्हाही विकासासाठी महत्त्वाचा असतो. देश एकसंघ नसेल तर तो केव्हाही गुलाम बनवू शकत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय गोटे यांनी विभाजन स्मृति का दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी भारताचा इतिहास आत्मसात करत चांगल्या गोष्टीचा बोध घेऊन त्याच्या प्रगतीमध्ये हातभार लावण्याचे आव्हान केली. कार्यक्रमाचे संचालन रासेयो स्वयमसेवक प्रज्वल जीजोटे व चेतन गुडदे यांनी केले , आभार अशोक गुडदे यांनी मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.




विभाजन विभिषिका स्मृतीदिन या प्रसंगी उपस्थित मान्यवर श्री संजय गोटे, डॉ तनपुरे सर

# देशोन्नती

## गोटे महाविद्यालयात विभाजन विभिषिका स्मृतीदिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विभाजन विभिषिका स्मृतिदिना निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य संजय गोटे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बी आर तनपुरे होते कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. तसेच भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांना याप्रसंगी श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. व्ही बी चांदजकर यांनी केले. त्यात त्यांनी फाळणीच्या वेळी अनेकांना



विस्थापित व्हावे लागले. अनेकांना आपला संसार सोडावा लागला. लोकांना बलिदान द्यावे लागले. त्यांच्या स्मृतींना कुठेतरी उजाळा मिळावा, तुझ्या आठवणी नेहमी आपल्या मनात राहाव्यात या व्यापक दृष्टिकोनातून अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या मार्गदर्शना डॉ. बी आर तनपुरे यांनी भारत पाकिस्तान फाळणी हे एक कटू सत्य असल्याचे सांगत फाळणीमुळे या दोन्ही देशांची प्रगती पाहिजे तेवढ्या प्रमाणात झाले नसल्याचे सांगितले. फाळणीच्या इतिहासाचा काळाकुट्ट असून तो इतिहास सन्मानाचा नसून भारतासाठी फार हानिकारक असल्याचे सांगितले. फाळणीमुळे युवावर्ग, वयोवृद्ध, लहान बालके, महिला यांना आपले प्राण द्यावे लागले. त्यांचे आज कुठेही नाव नसले तरी त्यांच्या आठवणी ह्या नेहमी मनात राहणे आवश्यक असून त्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन युवकांनी वाटचाल करण्याचे सांगितले. एकसंघ देश हा केव्हाही विकासासाठी महत्त्वाचा असतो. देश एकसंघ नसेल तर तो केव्हाही गुलाम बनवू शकत असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे संचालन रासेयो स्वयमसेवक प्रज्वल जीजोटे व चेतन गुडदे यांनी केले. आभार अशोक गुडदे यांनी मानले. सदर कार्यक्रमास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती(ता.प्र.)

> ❝ कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय गोटे यांनी विभाजन स्मृति का दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी भारताचा इतिहास आत्मसात करत चांगल्या गोष्टीचा बोध घेऊन त्याच्या प्रगतीमध्ये हातभार लावण्याचे आव्हान केली.

Washim Edition
Aug 17, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com